महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in I Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/ 1206 दिनांक:- 19 NOV 2025

वाचावे : १) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/१११, दिनांक ३०.१०.२०२५

२) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/१११८, दिनांक ०३.११.२०२५

३) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/११९८, दिनांक १७.११.२०२५

## परिपत्रक

**विषय :** शासकीय उच्चकला परीक्षा- प्रथम सत्र (1st Semester) (शैक्षणिक वर्ष २०२५-२६)
प्रथम सत्र परीक्षेकरिता विद्यार्थ्यांची नोंदणी/परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन सादर करणेबाबत...

उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ वरील परिपत्रकान्वये कला शिक्षण मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय उच्चकला प्रथम सत्र परीक्षेकरिता संलग्नित कला परिसंस्थांचे प्रमुख (कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य) यांनी त्यांचे अद्ययावत भ्रमणध्वनी क्रमांक व इ-मेल उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in/** या लिंकवर सादर केल्यानंतर प्राप्त होणाऱ्या गोपनीय क्रेडेंशिअल (युजरनेम व पासवर्ड) द्वारे लॉग-इन करुन कला परिसंस्थेची नोंदणी/अद्ययावत माहिती दिनांक ०३.११.२०२५ ते ०७.११.२०२५ या कालावधीत ऑनलाईन सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

०२. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कुलसचिव/ अधिष्ठाता/प्राचार्य यांनी आपल्या कला परिसंस्थेची नोंदणी/अद्ययावत माहिती ऑनलाईन सादर केल्यांनतर शासकीय उच्चकला प्रथम सत्र परीक्षेकरिता पात्र असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी/ परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन सादर करावयाचे आहे. त्याकरिता, आपल्या कला परिसंस्थेत सत्र पध्दतीनुसार पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सादर केलेली माहिती कुलसचिव/ अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉग-इनवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर माहिती तपासून परीक्षेस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क खालील नमूद कालावधीत ऑनलाईन सादर करण्यात यावे.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांची नोंदणी/परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन सादर करणे (कला परिसंस्थेमार्फत) | दिनांक १९.११.२०२५ ते २७.११.२०२५ |
| २ | परीक्षा शुल्काचा ऑनलाईन भरणा करणे. (कला परिसंस्थेमार्फत) | दिनांक २४.११.२०२५ ते २८.११.२०२५ |

०३. कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी आपल्या कला परिसंस्थेतील प्रवेशित व परीक्षेस पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क विहित कालावधीत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य आहे. कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. याबाबत संपूर्ण जबाबदारी कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील.

०४. प्रथम सत्र परीक्षेतील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य कला परिसंस्थांनी विद्यार्थी संख्येनुसार विहित कार्यपध्दीचा अवलंब करुन परिसंस्था स्तरावर खरेदी करावे. साहित्य खरेदी करण्यासाठी होणारा खर्च विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येणाऱ्या एकुण परीक्षा शुल्काच्या ३०% रकमेतून भागविण्यात यावा व उर्वरीत ७०% परीक्षा शुल्क कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरणा करण्यात यावे. शिल्पकला व प्रतिमानबंध पदविका तसेच वस्त्रकला पदविका या अभ्यासक्रमांच्या परीक्षेकरिता लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरिता जमा होणाऱ्या एकुण परीक्षा शुल्काच्या ३०% पेक्षा जास्त खर्च झाल्यास असा अतिरिक्त खर्च साहित्य खरेदीची मुळ देयके मंडळाकडे सादर केल्यानंतर देयकांच्या तपासणीअंती संबंधित कला परिसंस्थांना अदा करण्यात येईल. कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमनिहाय जमा करावयाचे परीक्षा शुल्क, परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी जमा शुल्कातून कपात करावयाचे (३०%) शुल्क व कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरावयाचे प्रती विद्यार्थी (७०%) शुल्क याबाबतचे विवरणपत्र सोबत जोडले असून त्यानुसार कला परिसंस्थांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

०५. कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क प्राप्त झालेल्या कला परिसंस्थेतील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक व परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) संबंधित कला परिसंस्थांच्या लॉग इनवर उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था.

प्रत,

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर/छत्रपती संभाजीनगर
४) निवड नस्ती.

## महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई
## शासकीय उच्चकला परीक्षा प्रथम सत्र
शैक्षणिक वर्ष २०२५-२६

परीक्षा शुल्काचे विवरणपत्र

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांकडून जमा करावायाचे परीक्षा शुल्क (प्रती विद्यार्थी) (रु.) | कला परिसंस्थांनी परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी जमा परीक्षा शुल्कातून कपात करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (३०%) (रु.) | कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरणा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (७०%) (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | फाऊंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट ॲन्ड डिझाईन | ४०० | १२० | २८० |
| २ | कला शिक्षक पदविका | ६०० | १८० | ४२० |
| ३ | कला शिक्षणशास्त्र पदविका | ९०० | २७० | ६३० |
| ४ | आर्ट मास्टर प्रमाणपत्र | ६०० | १८० | ४२० |
| ५ | रेखा व रंगकला पदविका | ८०० | २४० | ५६० |
| ६ | उपयोजित कला पदविका | ८०० | २४० | ५६० |
| ७ | शिल्पकला व प्रतिमानबंध पदविका | ८०० | २४० | ५६० |
| ८ | वस्त्रकला पदविका (प्रिंटींग ॲन्ड डाईंग) | ८०० | २४० | ५६० |
| ९ | वस्त्रकला पदविका (विव्हींग) | ८०० | २४० | ५६० |
| १० | अंतर्गत गृह सजावट पदविका | ८०० | २४० | ५६० |

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.